दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजश भांगे

● बीड/महाराष्ट्र ● बुधवार दि.५ मार्च २०२५ ● आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक-१२९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

### टीम इंडिया चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम फेरीत

**मुंबई**–टीम इंडियाने ऑस्ट्रेलियाचा ४ विकेट्सने पराभव करून चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. सेमीफायनलमध्ये चेस मास्टर विराट कोहली सामनावीर ठरला, ज्याने ८४ धावांची एक अतिशय महत्त्वाची खेळी केली.

मंगळवारी दुबई इंटरनॅशनल स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या उपांत्य सामन्यात कोहलीने धावांचा पाठलाग करताना ३ मोठ्या भागीदारी केल्या. त्याने श्रेयस अय्यरसोबत ९१, अक्षर पटेलसोबत ४४ आणि केएल राहुलसोबत ४७ धावा जोडल्या. या भागीदारींमुळे धावांचा पाठलाग सोपा झाला. शेवटी, हार्दिक पंड्याने जलद २८ धावा केल्या आणि केएल राहुलने षटकार मारून विजयावर शिक्कामोर्तब केले. तो ४२ धावा करून नाबाद परतला.ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करत २६५ धावांचे लक्ष्य ठेवले. ऑस्ट्रेलियाकडून कर्णधार स्टीव्ह स्मिथने ७३ आणि अॅलेक्स कॅरीने ६१ धावा केल्या. भारतीय गोलंदाजांनी ऑस्ट्रेलियाला सर्वबाद केले. मोहम्मद शमीने ३, रवींद्र जडेजा आणि वरुण चक्रवर्ती यांनी प्रत्येकी २ विकेट घेतल्या

# अखेर धनंजय मुंडे यांचा राजीनामा!

**मुंबई (प्रतिनिधी)–बीडचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांडात कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांचे जवळचे सहकारी वाल्मिक कराड याला आरोपी करण्यात आल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे (राष्ट्रवादी) मंत्री धनंजय मुंडे यांनी अखेर राजीनामा दिला आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माहिती दिली आहे. धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, धनंजय मुंडे यांनी माझ्याकडे राजीनामा सादर केला आहे. मी त्यांचा राजीनामा स्वीकारला असून, तो पुढील कारवाईसाठी राज्यपालांकडे पाठवला आहे.**

जानेवारीच्या सुरुवातीला, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीड सरपंच हत्या प्रकरणातील कोणत्याही आरोपीला सोडले जाणार नाही असे प्रतिपादन केले होते आणि या प्रकरणाचे राजकारण करू इच्छित नसल्याचे म्हटले होते. संतोष देशमुख यांच्या हत्याकांडात वाल्मिक कराडचे नाव समोर आल्यानंतर विरोधी पक्षातील नेत्यांसह सत्ताधारी पक्षातील नेत्यांनीही मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. संतोष देशमुख यांच्या हत्येवरून विरोधकांच्या दबावामुळे मुंडे यांनी अखेर आज राजीनामा देण्याचा निर्णय घेतला. जर धनंजय मुंडे यांनी आज राजीनामा दिला नाही तर सभागृहाचे कामकाज रोखतील, असा इशारा आज विरोधकांनी दिला होता.



### सरकार बरखास्त करण्याची गरज

कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांनी आज राजीनामा दिल्यानंतर प्रतिक्रिया देताना शिवसेना (उद्धव ठाकरे) आमदार आदित्य ठाकरे म्हणाले, मंत्रिपदाचा राजीनामा पुरेसा नाही. सरकार बरखास्त करण्याची गरज आहे. कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती बिघडली आहे. यावर कोणाचेही नियंत्रण राहिलेले नाही.

### संतोष देशमुख हत्या प्रकरण

बीडमधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची डिसेंबर २०२४ मध्ये अपहरण करून हत्या करण्यात आली होती. त्यानंतर या प्रकरणात सात आरोपींना अटक करण्यात आली आहे. तर, एक आरोपी अद्याप फरार आहे. २७ फेब्रुवारी रोजी, राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने बीड जिल्हा न्यायालयात सुमारे १,२०० पानांचे आरोपपत्र सादर केले, ज्यामध्ये देशमुख यांच्या हत्येचा आणि त्यासंबंधित दोन प्रकरणांचा समावेश आहे. बीडमधील केज पोलिस ठाण्यात सरपंच देशमुख यांची हत्या, आवदा कंपनीला खंडणी मागण्याचा प्रयत्न आणि कंपनीच्या सुरक्षा रक्षकावर हल्ला असे तीन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आरोपींवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्याअंतर्गत (मकोका) गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## संतोष देशमुख यांना अमानुष मारहाणीचे फोटो समोर आल्यानंतर केजमध्ये तणावपूर्ण शांतता

**केज । प्रतिनीधी**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केलं आहे. धनंजय मुंडे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याची माहिती फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना दिली.देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांनी माझ्याकडे राजीनामा दिलेला आहे. त्यांचा राजीनामा मी स्वीकारलेला आहे आणि पुढील कारवाईकरता राज्यपालांकडे पाठवला आहे. धनंजय मुंडे यांना राजीनामा स्वीकारून मुक्त करण्यात आलं आहे.



धनंजय मुंडे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर एक्स प्लॅटफॉर्मवरून पोस्ट करत प्रतिक्रिया दिली आहे. मुंडे म्हणाले, बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे स्व. संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येतील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी, ही माझी पहिल्या दिवसापासूनची ठाम मागणी आहे. काल समोर आलेले फोटो पाहून तर मन अत्यंत व्यथित झाले. या प्रकरणाचा तपास पूर्ण झाला असून आरोपपत्र न्यायालयात दाखल झाले आहे. तसेच, न्यायालयीन चौकशीही प्रस्तावित आहे. माझ्या सदसद् विवेक बुद्धीला स्मरून आणि मागील काही दिवसांपासून माझी प्रकृती ठीक नसल्याने पुढील काही दिवस उपचार घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे त्यामुळे वैद्यकीय कारणास्तव सुद्धा मी मंत्रिमंडळातून माझ्या मंत्रिपदाचा राजीनामा मुख्यमंत्री महोदयांकडे दिला आहे, असे धनंजय मुंडे यांनी म्हटले. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यानंतर निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. राज्यभरात या घटनेचे पडसाद उमटले, अशातच देशमुख यांची हत्या करतानाचे फोटो समोर आले आहेत. अतिशय क्रूरपणे त्यांची हत्या केल्याचं चित्र या फोटोंच्या माध्यमातून पुढे आलंय. हे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. गुन्हे अन्वेषण विभाग (उखऊ) या प्रकरणाचा तपास करत आहे. या प्रकरणात दाखल करण्यात आलेल्या आरोपपत्रात हे फोटो जोडण्यात आले आहेत. या फोटोंमध्ये आरोपी देशमुख यांना अमानुष मारहाण करताना दिसत आहेत. तर कोणी त्यांच्या शरीरावर पाय ठेवून फोटो काढला आहे. क्रूरतेची सीमा म्हणजे, या फोटोंमध्ये आरोपी देशमुख यांना मारहाण करत हसताना दिसत आहेत. फोटोमध्ये देशमुख यांचा चेहरा पूर्ण सुजलेला दिसत असून हे फोटो समोर आल्यानंतर विविध पातळीवर लोकांनी आपला तीव्र रोष व्यक्त केला. अनेकांनी एक्स या प्लॅटफॉर्मवरून आपला संताप व्यक्त करत राज्याचे गृहमंत्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना टॅग करत कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित केले होते. या प्रकरणातील आरोपींना राजकीय पाठबळ असल्याचा आरोप वारंवार करण्यात आला. या प्रकरणात पोलिसांनी दाखल केलेल्या आरोपपत्रात वाल्मिक कराड हाच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य सूत्रधार असल्याचा स्पष्टपणे उल्लेख करण्यात आला आहे.वाल्मिक कराड हा महाराष्ट्राचे अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांचा विश्वासू सहकारी मानला जातो. कराड याचं नाव समोर आल्यानंतर धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याच्या मागणीने चांगलाच जोर पकडला होता. अखेर त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. धनंजय देशमुख माध्यमांशी बोलताना म्हणाले, एकच फोटो बघून मी डोळे झाकले, मला सगळे फोटो बघवलेच गेले नाही. मी तुटून गेलोय, काय करावं काही समजत नाही, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. आरोपींना कसं वाचवलं जाईल याचं नियोजन केलं जातंय. पण मारेकऱ्यांना नियती माफ करणार नाही अशी भावना देशमुख यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली. मनोज जरांगे पाटील यांनी यावर प्रतिक्रिया दिली, माध्यमांशी बोलताना जरांगे म्हणाले,हे भयंकर कृत्य आहे. आरोपींना फाशीची शिक्षा होईपर्यंत लढावं लागणार आहे. जरांगेंनी धनंजय मुंडेंवर आरोप केले असून त्यांच्या राजीनाम्याची मागणी केलीय.

## जर न्याय मिळाला नाही तर कदाचित वेगळा निर्णय घेईन

### धनंजय देशमुख यांची काळजाला पिळवटून टाकणारे वक्तव्य

**केज । गौतम बचुटे**

माझ्या भावाच्या निर्घृण हत्या प्रकरणी जर कदाचित गुन्हेगारांना फाशी झाली नाही आणि संतोष आण्णा देशमुख यांच्या हत्या प्रकरणी जर न्याय मिळाला नाही. तर कदाचित मला वेगळा निर्णय घ्यावा लागेल. असे संतोष देशमुख यांचा छळ करून निर्दयी खून करण्यात आल्याचे फोटो व्हायरल झाल्या नंतर ते पहिल्या नंतर धनंजय देशमुख यांनी म्हटले असल्याने खळबळ उडाली आहे.

संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या झाल्या नंतर सुमारे अडीच महिन्या नंतर त्यांची हत्या होवून त्यांचा माणुसकीला आणि एखाद्या पशुला लाजवेल असा छळ करून अन्वित अत्याचार केले. क्रौर्याची परिसीमा ओलांडणारा छळ आणि त्याचे फोटो माध्यमातून प्रसारित झाले आहेत. ते फोटो पाहून राज्यात संतापाची लाट उसळली आहे. संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख हे ते सर्व फोटो पाहून विचलित झाले आहेत. त्यांनी म्हटले आहे की, आमचा न्यायव्यवस्थेवर पूर्णतः विश्वास आहे. परंतु यदाकदाचित जर गुन्हेगारांना फाशी झाली नाही. तर कदाचित मला



वेगळा निर्णय घ्यावा लागेल. असे भावनिक आणि हृदय पिळवटून टाकणारे वक्तव्य केले असल्याने खळबळ उडाली आहे. मात्र तो वेगळा निर्णय काय असेल याची चर्चा सुरू आहे.

## गंगापुरात जिल्हा न्यायालय व वरिष्ठ स्तर दिवानी न्यायालयाचे उद्घाटन

**छ. संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

गंगापूर शहरात रविवार, दि. ९ रोजी जिल्हा न्यायालय व दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर या दोन न्यायालयांचे उद्घाटन होणार असल्याची माहिती गंगापूर तालुका वकील संघाचे अध्यक्ष ड. किशोर कऱ्हाळे, सचिव ड. विठ्ठल काळे, उपाध्यक्ष ड. अमोल ठाकूर यांनी दिली. २७ फेब्रुवारीला तालुका वकील संघाला पत्र प्राप्त झाले असून रविवारी दुपारी एक वाजता गंगापूर न्यायालय परिसरात जिल्हा न्यायाधीशांच्या आदेशानुसार जिल्हा न्यायालय व दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर या दोन न्यायालयांचे उद्घाटन होणार आहे. सध्या गंगापूर तालुक्यासाठी जिल्हा न्यायालय म्हणून वैजापूरला जोडण्यात आले आहे. या न्यायालयाची गंगापूर तालुक्यातील जनतेला प्रतीक्षा होती. या न्यायालयामुळे न्याय प्रक्रिया गतिमान होऊन पक्षकारांचा वेळ व पैसाही वाचेल, अशी माहिती ड. किशोर कऱ्हाळे यांनी दिली

## जिल्हा परिषदेच्या उर्दू शाळा सकाळ सत्रात

**छ. संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

जिल्हा परिषद शिक्षण विभागाने रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर केवळ उर्दू माध्यमाच्या शाळा सोमवार (ता. तीन) पासून सकाळच्या सत्रात भरविण्याचा निर्णय घेतला. मात्र, यामुळे इतर माध्यमांच्या शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या मुस्लिम विद्यार्थ्यांचे काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

उन्हाचा कडाका जाणवत आहे. त्यामुळे सकाळच्या सत्रात शाळा भरल्यास विद्यार्थ्यांना उन्हाच्या त्रासातून काहीसा दिलासा मिळतो. मात्र, शिक्षण विभागाने उर्दू शाळांसाठीच हा निर्णय घेतल्याने त्याविषयी चर्चा सुरू झाली. शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण आणि अश्विनी लाठकर यांनी दिलेल्या सूचनेनुसार, जिल्ह्यातील सर्व उर्दू माध्यमांच्या शाळांना शालेय व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने सकाळी सात ते दुपारी साडेबारा यावेळेत वर्ग भरविण्यास परवानगी देण्यात आली.६६उर्दू माध्यमाच्या शाळा सकाळच्या सत्रात भरविण्याच्या जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या आदेशाचे आम्ही स्वागत करतो. मात्र, मराठी माध्यमाच्या शाळासुद्धा सकाळच्या सत्रात भरविण्याचे आदेश प्रशासनाने द्यावेत; कारण उन्हाचा त्रास सर्वच विद्यार्थ्यांना होतो.

विजय साळकर, जिल्हाध्यक्ष, शिक्षक समिती.परंतु, मराठी माध्यमाच्या शाळांमध्येही मोठ्या प्रमाणावर मुस्लिम विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यांनाही रोजा (उपवास) असल्याने सकाळच्या सत्राचा फायदा झाला असता; तसेच उन्हाच्या झळांपासून संरक्षण मिळण्यासाठी इतर सर्वच शाळांसाठी हा निर्णय लागू करण्याची गरज आहे. सर्व माध्यमांच्या शाळाही सकाळच्या सत्रात भरविण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी होत आहे.

## प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेच्या लाभार्थ्यांस आर्थिक मदतीचे वितरण

**जालना । असलम कुरेशी**

बँक ऑफ महाराष्ट्र विभागीय कार्यालय छत्रपती संभाजीनगर, जिल्हा अग्रणी बँक व आर्थिक साक्षरता केंद्र तसेच बँक ऑफ महाराष्ट्र शाखा दानापुरच्या वतीने केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेअंतर्गत नईम मोईन शेख यांना विमा रक्कमचे वितरण प्रबंधक विवेक नाचणे यांच्या हस्ते करण्यात आले.या योजनेचा उद्देश कुटुंबियांना आर्थिक सुरक्षेची हमी देणे हा आहे. आपल्या कुटुंबातील सदस्यांची आर्थिक सुरक्षिततेसाठी विमा योजना आवश्यक आहे, तरी जिल्ह्यातील सर्व पात्र नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन विवेक नाचणे यांनी केले



आहे. जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक प्रेषित मोघे यांनी सांगितले की, या योजनेअंतर्गत गरीब गरजू कुटुंबास आर्थिक मदतीचा लाभ मिळाला असून, भविष्यातही गरजू नागरिकांसाठी या योजनेचा जास्तीत जास्त प्रचार आणि प्रसार जिल्ह्यातील सर्व शासकीय व निमशासकीय बँकांकडून करण्यात येत आहे. १८ ते ५० वर्षे वयोगटातील नागरिकांसाठी ही योजना खुली आहे. वार्षिक फक्त ४३६ रुपयांच्या प्रीमियममध्ये २ लाखांचा विमा संरक्षण मिळतो. मृत्यूनंतर कुटुंबियांना थेट आर्थिक मदत दिली जाते. असा या योजनेचा फायदा होतो. या कार्यक्रमास बँक ऑफ महाराष्ट्रचे विभागीय व्यवस्थापक विवेक नाचणे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक प्रेषित मोघे, दानापूर शाखेचे व्यवस्थापक राहुल भिलाणे, वित्तीय साक्षरता अधिकारी कैलास तावडे उपस्थित होते. लाभार्थ्यांनी यावेळी सरकारच्या योजनेबद्दल समाधान व्यक्त केले.

## केज आणि मस्साजोग कडकडीत बंद

**केज । गौतम बचुटे**

संतोष देशमुख यांच्या हत्येच्या आणि केलेल्या छळाचे फोटो सोशल मीडिया आणि प्रसार माध्यमावर प्रसिद्ध झाल्या नंतर राज्यात संतापाची लाट उसळली आहे. सर्वत्र त्या घटनेचे निषेध व्यक्त होत असून केज आणि मस्साजोग येथे ग्रामस्थांनी स्फुर्तपणे कडकडीत बंद पाळला. यावेळी आंदोलकांनी केज येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या जवळ टायर पेटवून धनंजय मुंडे यांचा निषेध व्यक्त करीत त्यांच्या विरोधात घोषणा दिल्या.



बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करताना त्यांच्या मारेकऱ्यांनी अत्यंत निर्दयपणे आणि त्यांचे छळ करून मारहाण केली. त्याचे फोटो सोशल मीडिया आणि प्रसार माध्यमात प्रसिद्ध झालेले असून महाराष्ट्र राज्यातील नागरिका मध्ये प्रचंड अशी चीड आणि संतापाची लाट निर्माण झाली आहे. यामुळे नागरिकांच्या तळपायाची आग मस्तकात गेले आहे. त्यामुळे दि. ४ मार्च रोजी केज आणि मससाजोग येथे नागरिकांनी उत्स्फूर्तपणे कडकडीत बंद पाळला. यावेळी केज शहरात नागरिकांनी एक रॅली काढून त्याद्वारे सर्वांनी बंद पाळण्याचे आवाहन केले. यावेळी जमावातील तरुणांनी या हत्या प्रकरणाची संबंधित असल्याचा संशय व्यक्त होत असलेले धनंजय मुंडे यांच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी देखील केली. तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या जवळ टायर जाळून धनंजय मुंडे आणि सरकारचा निषेध केला. यावेळी पोलिसांनी पाणी टाकून आग आटोक्यात आणली. तसेच संतोष देशमुख यांचे गाव मस्साजोग येथेही कडकडीत बंद पाळण्यात आला. देशमुख कुटुंबीयांची भेट घेण्यासाठी यावेळी मराठा योद्धे मनोज जरांगे, खा. बजरंग सोनवणे आणि विविध पक्ष व संघटनांचे अनेक पदाधिकारी व नागरिक या ठिकाणी येऊन त्यांचे सांत्वन करीत आहेत.

## संपादकीय..

# या सर्वांची जबाबदारी अखेर घेणार कोण?

असं म्हणतात की, एखादी गोष्ट घडण्यासाठी काहीतरी निमित्त लागते. तसेच सध्या काहीतरी घडत आहे. गेल्या आठवड्यात सर्वाधिक चर्चेत राहिलेली गोष्ट म्हणजे आणि पुण्यातील बलात्काराची घटना. या घटनेने सध्या पुणेच हादरलेले नसून, तर देशच हादरलेला आहे. बलात्कार म्हटले, तर ही काही नवीन गोष्ट नाही रोज वर्तमानपत्रात कानाकोपरा नजर टाकली तरी त्यात असंख्य बलात्काराच्या घटना दिसतील. मात्र त्यातल्या काही घटना चर्चेला येतात. स्वारगेटमधील बलात्कार हासुद्धा हा याच चर्चेतील वर्गातला. भर गर्दीत, वर्दळीच्या ठिकाणी असलेल्या व एका कोपऱ्यात एकांतात झालेला हा बलात्कार. या बद्दल सर्वांच्याच मनात चीड उत्पन्न झाली नसती तर नवल. त्यामुळे पुण्याचाच नव्हे तर महाराष्ट्राच्याच प्रतिमेला एक डाग निर्माण झाला मात्र वर म्हंटल्याप्रमाणे कोणती घटना घडण्यासाठी कोणते तरी निमित्त लागते. बलात्कार झाला ही दुर्दैवाची गोष्ट आहेच; परंतु त्यानिमित्ताने आपल्या समाज मनाची एसटी प्रशासनाची पोलिसांची सर्वांची झाडाझडती घेण्याची वेळ आली हे नसे का थोडके, त्यामुळे या बलात्कार प्रकरणाचा निकाल लागेल तो लागेलच मात्र त्यानिमित्ताने एसटी प्रशासन पोलीस सर्वांनाच आत्मपरीक्षण करावे लागेल हे नक्की.स्वारगेट येथील बस स्थानक येथे पहाटेच्या सुमारास फलटणकडे जाणाऱ्या मुलीवर बस स्थानक परिसरात उभ्या असणाऱ्या जुन्या शिवशाही बसमध्ये एकाने बलात्कार केला ही गोष्ट ज्या वेळेस उजेडात आली तेव्हा साधारण आठ वाजले होते. स्वारगेटसारखे वर्दळीचे बस स्थानक महाराष्ट्रात दुसरे कोणते नसेल. पुण्यातील स्वारगेट येथूनच सातारा, कोल्हापूर, कोकण, मुंबई, सोलापूर, मराठवाडा, तसेच फलटण, पंढरपूर सारख्या ठिकाणांसाठी व तिथून येणाऱ्या जाणाऱ्या बस गाड्या अक्षरशः २४ तास सुटत असतात अशात अशा वेळेस बलात्कार घटना होणे म्हणजे अशक्यच अशी गोष्ट होती असा तर्क लावला गेला. मात्र यात स्वारगेट परिसरात बस स्थानकात एका कोपऱ्यात झालेला जुन्या बसचा भंगार खाना तसेच सुरक्षिततेत चाललेली हयगय पाहता एसटी महामंडळाच्या कामांची झाडा -झडती घेणे क्रमप्राप्त झाले. ही घटना घडली तेव्हा कशी घडली तसेच हा स्वखुशीचा मामला होता की, केलेली जोर जबरदस्ती होती याचा कायद्यानुसार निकाल लागेलच मात्र त्या आनुषंगाने एसटी महामंडळाच्या दुर्लक्षित केलेल्या कामांचे धांधोळा ही आवश्यक ठरतो.मुंबई पुरता विचार केला तर मुंबई शहरासाठी एसटीचे तीन मोठे बस आगार आहेत. मुंबई सेंट्रल आगार. परळ आगार व कुर्ला नेहरू नगर आगार, तर दादर पुलाखाली एक छोटी जागा बस सुटण्यासाठी दिलेली आहे. पश्चिम उपनगरात बोरिवली येथे एसटीचे मोठे बस स्थानक आहे मात्र त्याला आगाराचा दर्जा नाही. त्यामुळे बोरिवली नॅन्सी वसाहत येथील बस स्थानक व स्टेशनजवळील सुकुरवाडी बस स्थानक हीच काय ती एसटीचे स्थानके मात्र यांची तरी काय अवस्था आहे? वास्तविक पाहता एसटीची बस स्थानके ही वेगळा संशोधनाचा व अभ्यासाचा विषय आहेत, मात्र आता स्वारगेट घटनेमधून यावर सर्वत्र जोरदार चर्चा होईल थोडे दिवस त्याचे पालन केले जाईल मात्र नंतर पूर्वीसारखीच अवस्था होईल. मुंबई सेंट्रल येथील बसस्थानकाची तीच अवस्था त्यात असंख्य जाणारे मार्ग. त्यात चोर वाटा फार, कोण कोणता अगंतुक येतो याचा कोणालाही पत्ता नाही. पूर्वी मुंबई सेंट्रल बस स्थानकात बाहेरील कोणत्याही प्रवेश करणाऱ्या व्यक्तीस एक रुपया दर आकारला जात असे मात्र कालांतराने तोही बंद करण्यात आला. परळची अवस्था ही तीच तर कुर्ला नेहरूनगर बस स्थानकाचे, तर विचारायलाच नको कुर्ला नेहरूनगर बस आगार आहे की, आरटीओचा जुन्या व पकडून आणलेल्या गाड्या एकीकडचा भंगार गोळा करून त्याचे डोंगरच्या डोंगर थर तेथील आगारात तयार केले गेले आहेत त्यात असंख्य बेकायदेशीर कृत्य करण्याचे कुर्ला तर आत्ताच जणू बनलेला आहे. मध्यंतरी तेथे आरटीओचे केंद्र तयार होणार होते मात्र तेही रेंगाळले त्यामुळे पुन्हा ही जागा ओसाड बनू लागली असून आजूबाजूच्या झोपडपट्ट्यातील वाईट प्रवृत्ती आगाराच्या भिंत तोडून बोगदे तयार करतात आणि नवनव्या वाटा निर्माण केल्या जातात. येथील सुरक्षारक्षकांकडे त्यांना पळवले जाते मात्र त्याच्यावरही काही मर्यादा पडतात.काही समाजसेवी संस्था तसेच एसटी प्रेमी संस्था एसटी लवर्स ग्रुप असे महाराष्ट्रातील काही मंडळी वारंवार एसटीकडे सुरक्षेबाबत तक्रार करीत असतात त्यात मुंबईतील तसेच राज्य राज्यातील बस स्थानकांवर तेथील त्रुटी निदर्शनास आणून देत असतात स्वारगेट बस स्थानकातील बंद पडलेल्या बसेस गैरप्रवृत्तींचा अड्डा बनत चाललेल्या आहेत याकडे त्यांनी लक्ष वेधले होते मात्र नेहमीप्रमाणे एसटी महामंडळ आणि संबंधितांनी त्याकडे दुर्लक्ष केले त्याचीच परिणीती म्हणून त्या दिवशीची ही घटना समोर आली आणि नाव मात्र एसटी महामंडळाचे जनमानसात डागाळले. मुळात बस स्थानक हे बस स्थानकच असले पाहिजे त्यात स्क्रॅप व वस्तीच्या व इतर ठिकाणांवरून येणाऱ्या गाड्या नको तसेच एसटी बस स्थानकातील बस गाड्यांचे पार्किंग नको याकडे असंख्य वेळा लक्ष वेधण्यात आले होते. बस गाड्या ह्या आगारातच उभ्या केल्या पाहिजेत बस स्थानकात नको मात्र आज इतर ठिकाणावरून आलेल्या बस गाड्या या सर्व बस स्थानकात उभ्या केल्या जातात. तसेच या बस गाड्यांना कोणतीही लॉक सिस्टीम नसल्याने यामध्ये गैरप्रकार चालतात. तसेच प्रत्येक बस स्थानकात बाजारात चांगल्या प्रतीचे उच्च क्षमतेची दिवे लावावे ज्यामुळे संपूर्ण ठिकाणी सूर्यप्रकाश चांगला पडून गैरकृत्य होणार नाही याकडेही लक्ष वेधण्यात आले होते, मात्र त्याकडे महामंडळाने दुर्लक्ष केले. अंधारातच असे गैर प्रकार घडत असतात त्यात पोलिसांची गाडी आली का थातूरमातूर कारवाई होते मात्र पुन्हा परिस्थिती जैसे थे होते. त्यामुळे महिलांना या अंधारामुळे असंख्य प्रकारचा त्रास सहन करावा लागतो व असुरक्षितता निर्माण होते.एसटी बस स्थानकात फिरणारे गर्दुल्ले भिकारी तृतीयपंथीयांचा मोठा संशोधनाचा विषय आहे काही गर्दुल्ले भिकाऱ्यांचा वावर हा बस स्थानकात कायमचा असतो त्यात ठाणे खोपट ठाणे सीबीएस तर ठाणे रेल्वे स्थानकातील स्थानक तर परिसरात विचारायलाच नको अशी परिस्थिती आहे. वास्तविक पाहता बस स्थानकात व परिसरात फक्त बस गाड्यांना एन्ट्री असते मात्र सर्रास बस स्थानकातच रिक्षा व इतर खासगी गाड्या पार केलेल्या सर्वत्र आढळून येतात. बस स्थानकातील मुताऱ्यांची तर विचारता सोय नाही आधीच अस्वच्छ असलेल्या या मुताऱ्यात चांगल्या सुसंस्कृत माणसाला त्या ठिकाणी जाणे हे अवघडल्यासारखे वाटू शकते कारण तिथे असलेले समलैंगिक, विकृत प्रकारच्या व्यक्ती त्यांच्या नजरा नको आणणारा हा अनुभव असतो. या एसटी बस स्थानकत परिसरात सर्वांचा संचार असल्याने पाकीटमारी बस प्रवाशांचे सामान्यांच्या चोऱ्या या तर नित्य नियमितपणे सुरू असतात. कल्याण बस स्थानक हे त्याचे चांगले उदाहरण ठरते. महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक बस तालुक्यात खासगी एजंटचा सुळसुळाट पाहायला मिळतो अक्षरशः एजंट प्रवाशांना पकडून पकडून घेऊन जीप, रिक्षा, टॅक्सी, लक्झरी यात बसवत असतात हे कोणाच्या आर्थिक देवाण-घेवाणतून घडत असते याचाही सर्व निकाल लागण्याची आज गरज आहे स्वारगेट येथील ती महिला बस स्थानकात बसली असताना आपण बस वाहक असल्याचे सांगत त्या महिलेला त्या बसमध्ये जबरदस्तीने देण्यात आले आज या दलालांवर नियंत्रण आणणार कोण. बस स्थानकातील सीसीटीव्ही कॅमेरे हे सुद्धा सर्वत्र असले तरी बंद पडलेले असतात



चौसाळा येथील मे. भिलारे ॲग्रो सर्विसेस अँड बोरवेल चे प्रो. प्रा अमोल भिलारे हे नुकतेच शेती विषयक आणि आधुनिक तंत्रज्ञान याचा अभ्यास करण्यासाठी नुकतेच परदेश दौरा यशस्वी करून परत आले असता चौसाळा येथे मित्र परिवाराच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

# आमची दुसरीही बाजू ऐकून घ्या हो!

यंदा माघी गणेशोत्सवाला पुन्हा वाद उफाळून वर आला, तो म्हणजे प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्तींचा! दरवर्षीप्रमाणे यंदाही वाजतगाजत गणपती मंडपात आले. मात्र विसर्जनाचा त्यांचा मार्ग खडतर बनला, यंदा मुंबई महानगरपालिकेने पीओपीच्या मूर्तींचे समुद्रात विसर्जन करायचं नाही, असे आदेश दिले होते. त्यामुळे एकतर विसर्जन रखडलं आणि सोबतच पालिका आणि गणेश मंडळांमध्ये राडा पाहायला मिळाला. गणेशोत्सव हा सण पूर्णपणे बदलण्याची योजना तर आखली जात आहे का? असा सवाल सध्या सर्व स्तरातून विचारला जात आहे. शाडूची माती पर्यावरणपूरक व प्लास्टर ऑफ पॅरिस हे पर्यावरणाला हानी करणारे असे आपल्या मनावर जाणूनबुजून बिंबविले जात आहे, मात्र दुसरी बाजू व फायदे-तोटे न जाणून घेताच हे सर्व पद्धतशीरपणे केले जात असल्याचा मतप्रवाह सध्या दिसून येत आहे. तसेच आमचीही मूर्तिकारांची दुसरीही बाजू एकूण घ्या हो, असे म्हणत लाखो मूर्तिकार एकवटले आहेत.

यंदा माघी गणेशोत्सवातल्या सार्वजनिक मूर्तींचं विसर्जन समुद्रात करायला पालिकेने नकार दिल्यामुळे पीओपीच्या मूर्ती बनविणारे मूर्तिकार आणि सार्वजनिक मंडळांमध्ये वादंग उठला आहे. पीओपीच्या मूर्ती तयार करणं, त्यांची विक्री करणं आणि त्यांचं विसर्जन करणं यावर केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने सुधारित मार्गदर्शक तत्त्वांनुसार बंदी घातली आहे. त्यातच सुप्रीम कोर्टानेही ती मार्गदर्शक तत्त्वं योग्य ठरवली होती. त्यामुळेच माघी गणेशोत्सवाला पीओपीच्या मूर्तींची विक्री होऊ देऊ नका आणि ती झाली तर त्या मूर्तींचे विसर्जन करायला देऊ नका, असे आदेश हायकोर्ट, एमपीसीबी, राज्य सरकार आणि विविध महापालिकांनी दिले होते. मात्र खरंच पीओपी हे निसर्गाला हानिकारक आहे का? जागतिक पातळीवर मातीवर सुद्धा वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनने संशोधन निर्माण करून ठेवलेले आहे व त्यानुसार मातीही प्लास्टर ऑफ पॅरिस पेक्षाही मानवाला व पर्यावरणाला घातक आहे हे सिद्ध केले आहे. माती व प्लास्टर ऑफ पॅरिस दोन्ही गोष्टी पूर्णपणे नैसर्गिक आहेत पण मातीत आठच्यावर रासायनिक संयुगे आहेत तर प्लास्टर ऑफ पॅरिसमध्ये फक्त दोनच संयुगे आहेत. नदीच्या पात्रातील प्लास्टर ऑफ पॅरिस ऊर्फ नैसर्गिक जिप्सममधून कॅल्शियम व सल्फेट ही दोनच संयुगे पिण्याच्या पाण्यात जातील व पाणी प्रदूषित करतील, तर मातीची मूर्ती पिण्याच्या पाण्यात विसर्जन केल्यास सिलिका, लोह, ल्युमिनियम, मँगेनीज, मॅग्नेशियम, पोटॅशियम, सोडियमसारखी आठ खनिजे त्यांच्या संयुगासह पाण्यात जातील व पिण्याचे पाणी जास्त प्रदूषित, परिणामकारक करतील. नैसर्गिक माती ही वरून पिण्याच्या पाण्यात टाकणे हे पिण्याच्या पाण्याच्या दृष्टीने प्लास्टर ऑफ पॅरिसपेक्षा पर्यावरणाला जास्त हानिकारक आहे. मातीमुळे नद्यांत मातीचे थर साचून राहून नैसर्गिक झरे बुजवले जातील.

नैसर्गिक सर्व मातींसाठी २००५ साली जागतिक आरोग्य संघटनेने जवळजवळ ५० ते ६० वर्षे माती संशोधनावरचे सर्व वैज्ञानिक निष्कर्ष घेऊन एक विस्तृत अहवाल मातीच्या घातकतेसंबंधी प्रसिद्ध केला आहे. त्या अहवालात मातीत नैसर्गिक क्वार्ट्झ असल्याने सतत माती संपर्कात आल्यास मानवाला सिलीकोसिसमुळे फुप्फुसावर परिणाम होऊन श्वसनाचे रोग तसेच कॅन्सरचा धोका निर्माण होतो असे निष्कर्ष प्रसिद्ध केले आहेत. आयआरएसी मोनोग्राफचा टॉक्सिकोलोजिकल रिपोर्टनुसार, मातीच्या सुरक्षा तत्त्वानुसार जगात सर्वत्र माती आता पुरवली जाते. बॉलक्ले, चायना क्ले, केओलिन यांच्या संपर्कात जास्त वेळ आल्यास कर्करोगाचा धोका अधिक जाणवतो. त्यामुळे मातीही हार्मफूल घातक श्रेणीत मोडली जाते, तर प्लास्टर ऑफ पॅरिस याला मात्र पर्यावरणप्रेमी स्थान घटकात अजिबात नसल्याने विज्ञानाने त्याला सुरक्षित उत्पादन मानले आहे.

९ मे २०१३ रोजी लवादाच्या दिल्ली विभागाने निर्णय दिला होता. लवादाने केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे म्हणणे अमान्य केले असून प्लास्टर ऑफ पॅरिसमुळे जलप्रदूषण होत नसल्याचे स्पष्ट केले आहे. यासाठी लवादाने पुणे स्थित सृष्टी इको रिसर्च इन्स्टिट्यूट सेरी या संस्थेने एअर क्वालिटी मॅनेजमेंट सेल यांच्यासोबत पुणे येथे केलेल्या सर्वेक्षणाचा अहवाल आधारभूत मानला आहे. २०१२ साली केलेल्या सर्वेक्षणाच्या निष्कर्षानुसार मुठा नदीत दररोज सुमारे १५ टन कचरा जमा होतो. गणेशमूर्तींच्या विसर्जनाने या रोजच्या कचऱ्यात एक टक्क्याहून कमी भर पडते तीही वर्षातून एकदाच. सेरीचे अध्यक्ष डॉ. संदीप जोशी यांच्या मते, सीपीसीबीच्या निर्देशानुसार पाहू गेल्यास पीओपी प्रदूषक असल्याचे कुठेच आढळत नाही. नदीत पीओपीच्या गणेश मूर्ती विसर्जित केल्याने प्रदूषण होते असे महाराष्ट्र प्रदूषण नियम मंडळ देखील म्हणत नाही, तर मूर्तिकारांच्या मते लोकांमध्ये उगाचच काहीतरी अपसमज आहेत. खरं तर पीओपीमुळे प्रदूषण होत नसून उलट शेत जमिनीची उत्पादनक्षमता वाढते. पीओपी पाण्यात लवकर विरघळत नाही ते तळाशीच साचून राहते. पीओपीमुळे पाण्यात अल्कली होते. इत्यादी मते लवादाने आपला निर्णय देताना अमान्य केली आहेत. २०१३ साली एका इंग्रजी वृत्तपत्रात डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे मत प्रसिद्ध झाले आहे. ते म्हणत होते की, मूर्तिकार तर या निर्णयाचे स्वागत करतील; परंतु आम्ही आमच्या मतांशी चिकटून राहणार आहोत आणि पीओपीच्या गणेशमूर्ती वापरू नयेत असा प्रचार करणार आहोत. शाडूच्या मूर्ती तुलनेने महाग असतात, त्या घेणे लोकांना परवडतेच असे नाही. तेव्हा विरोधकांचे हे कोणते षडयंत्र तर नाही याचा ही विचार व्हायला हवा. सध्या महाराष्ट्रात ५ टक्के मूर्ती या शाडू मातीच्या बनतात, तर ९५ टक्के मूर्त्या या पीओपीच्या बनतात. महाराष्ट्रातील गणपतीला १३० वर्षे जुनी परंपरा आहे. गेल्या साठ वर्षांपासून पीओपीपासून गणपती बनतात. शाडू माती परवडण्यासारखी नाही. शाडू मातीची गणेश मूर्ती ही गणेशोत्सवाच्या तीन महिने अगोदर बनवली तर गणपतीच्या वेळेस त्याला थोडासा जरी ओलसरपणा राहिला तर त्या मूर्तीला तडे जाऊन मूर्ती भंग पाहू शकते. अशा तडा गेलेल्या मूर्तीला शास्त्रात परवानगी नाही. ती विसर्जित करावी लागते. तेव्हा याची जबाबदारी राज्य सरकार घेणार की, महापालिका घेणार आहे. शाडू मातीच्या मूर्ती या उंच मूर्ती बनवू शकत नाहीत. त्याला मर्यादा आहेत. महापालिकेने कितीही माती पुरवण्याचा प्रयत्न केला तरी तो तोकडाच पडणार आहे.

शाडू मातीसाठी उत्खनन करणे हे सुद्धा निसर्गाच्या विरोधात आहे मग ते संयुक्तिक कसे ठरते, बरं दुसरी गोष्ट न्यायालयाने दिलेला नियम जर सर्वांसाठी असेल तर मग तो इतर राज्यांसाठी लागू नाही का? फक्त महाराष्ट्रात गणेशोत्सव साजरा होतो म्हणून तेथेच हा नियम का लावला जात आहे. पीओपीच्या मूर्ती या तेलंगणा, गुजरात सारख्या राज्यात का चालतात, तेथे तर कोणती बंदी नाही.मात्र महाराष्ट्रातच ही बंदी का आहे?, हा दुजाभाव नाही का? हे महाराष्ट्र राज्यातच राजकारण का सुरू आहे असा सवालही विचारला जात आहे. गणेशोत्सवात अवघ्या तीन महिन्यांत महाराष्ट्रात ६० ते ७० हजार कोटींची उलाढाल होत असते. जर पीओपी बंद करून शाडू मातीची जबरदस्ती केल्यास पन्नास टक्के घरातही मूर्त्या बसणार नाहीत. त्यामुळे आता उत्सवच बंद करण्याच्या प्रयत्न तर कोणी नाही ना हेही तपासून पाहिले पाहिजे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्य सरकार न्यायालयात जाणार हे ठरले होते मग अजूनही न्यायालयात दाद मागण्यास सरकार विलंब का करत आहे. सरकार न्यायालयात जाईपर्यंत वेळ टळून तर जाणार नाही ना अशी शंका मूर्तिकार व जनसामान्यांमध्ये आहे. या गोष्टीचा आता सर्वांगीण विचार झाला पाहिजे. मुळात जो लवादाने निकाल दिला होता त्यात त्या मूर्त्यांवर रासायनिक रंग मारू नये असा दिला होता. मात्र मूर्त्यांबाबत तो लागू केल्यास आता शाडूच्या मूर्त्यांवरही केमिकल रंग मारले जात आहेत.मग खरे प्रदूषण कशामुळे होते? गणपती उत्सवामुळे आतापर्यंत कधीही प्रदूषण झाल्याचे ऐकण्यात नाही किंवा गणेश विसर्जनानंतर मेलेल्या माशांचा खच झाल्याचे आतापर्यंत कधीही आढळलेले नाही सीपीसीबी (सेंट्रल पोल्युशन कंट्रोल बोर्ड) यांनी केमिकल रंग वापरू नयेत तर नैसर्गिक रंग वापरावेत असे आदेश दिलेले असतानाही हा खोडसाळपणा करून प्रदूषणाच्या बाबतीत उगीचच खोट्या बातम्या पसरवून हा एक सणच बंद करण्याचे षडयंत्र रचले जात तर नाही ना? आज इतकी वर्षे सर्व काही सुरळीत असताना आज अचानक प्रदूषणाचा बागुलबुवा कोणी उभा केला आहे. आज यामुळेच पेण-हमरापूरमध्ये सर्व शुकशुकाट आहे. कारखाने बंद आहेत. हजारो लोकांचा व्यवसाय धोक्यात आला आहे. एकट्या महाराष्ट्रात घरगुती एक ते दीड कोटी मूर्त्या लागतात. त्यातील ३० ते ४० टक्के मूर्त्या या पेण-हमरापूरमध्येच बनवल्या जातात. आता वेगवेगळ्या मूर्तिकारांच्या संघटना या न्यायालयात गेल्या असून आता मात्र सरकारनेही त्यांना पाठिंबा देऊन न्यायालयात जाऊन आपली योग्य भूमिका मांडणे हे मूर्तिकारांनाचं नव्हे तर राज्यातील जनतेलाही तसेच बाप्पालाही यातून सोडवले पाहिजे हीच सर्वसामान्यांकडून अपेक्षा.

# मराठवाड्यात उद्योगांची पीछेहाट

मराठवाड्यात एकूण आठ जिल्हे आहेत. त्यापैकी छत्रपती संभाजीनगर वगळता अन्य सात जिल्ह्यांत उद्योगांची म्हणावी तशी प्रगती नाही. दळणवळणाची साधने असतील तर कुठलाही उद्योग टिकतो. मराठवाड्यातील लातूर व नांदेड जिल्ह्याला महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद मिळाले होते; परंतु या दोन्ही जिल्ह्यातही उद्योगांची पीछेहाटच आहे. आता मराठवाड्यात रोजगार मेळावे भरत आहेत. या मेळाव्यांच्या माध्यमातून कुशल कामगार तर मिळतील, परंतु मराठवाड्यात उद्योग आहेत का हा प्रश्न बेरोजगार व तरुण वर्गाला भेडसावत आहे.



मराठवाड्यात नवनवीन उद्योग आले पाहिजेत व ते टिकले पाहिजेत. या दृष्टीने हालचाली होणे गरजेचे आहे. राजकीय नेत्यांनी मनावर घेतले तर मोठ-मोठे उद्योग मराठवाड्याच्या जमिनीवर सुरू होऊ शकतात; परंतु त्या नेत्यांची उद्योजकांना मनधरणी करण्याची मानसिकता नाही की काय? असा प्रश्न मराठवाड्यातील बेरोजगार व युवा वर्ग उपस्थित करत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून मराठवाड्यात सद्यस्थितीला राजकीय नेते रोजगार मिळावे भरवत आहेत. या रोजगार मेळाव्यांचा समाजाला किती फायदा होईल, ही वेगळी बाब असली तरी मराठवाड्यात उद्योग उभारणे व ते टिकविणे मोठे जिकिरीचे काम होऊन बसले आहे. दळण-वळणाच्या सुविधा असतील तर औद्योगिक वसाहतींद्वारे उद्योग टिकतात व वाढतात. यासाठी केवळ शासनाची सकारात्मक भूमिका असून चालणार नाही, त्यासाठी उद्योजकांचे प्रामाणिक प्रयत्न व मागणीप्रमाणे उद्योग असणे गरजेचे आहे. सध्या मराठवाड्याच्या बाबतीत एक आनंद वार्ता कानावर येत आहे. एका उद्योगाच्या निमित्ताने मराठवाड्याचे नशीब पालटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अमेरिकन इलेक्ट्रिक कार निर्माते यांची कंपनी टेस्ला भारतात प्रवेश करणार आहे. मार्चनंतर कंपनीचे अधिकारी भारताला भेट देणार आहेत. ही कंपनी जगप्रसिद्ध आहे. इलॉन मस्क हे प्रसिद्ध उद्योगपती या कंपनीचे सर्वेसर्वा आहेत. महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर आणि गुजरात या ठिकाणी यासाठी चाचपणी झाली. टेस्ला कंपनी भारतात किमान पाच अब्ज गुंतवणूक करू शकते. टेस्ला भारतातील वेगवेगळ्या राज्यांत पाहणी करून सकारात्मक शोध घेत आहे. विशेष म्हणजे मराठवाड्यात आजही मोठ्या उद्योगांची प्रतीक्षा आहे, त्यासाठी छत्रपती संभाजीनगरात ही कंपनी सुरू झाल्यास मराठवाड्याचे भाग्य बदलणार आहे. टेस्ला कंपनीच्या ईव्ही कारचे पार्ट भारतातील आठ कंपन्या पुरवतात. यापैकी तीन कंपन्या छत्रपती संभाजीनगरात आहेत. त्यामुळे टेस्ला कंपनीच्या छत्रपती संभाजीनगरातील गुंतवणुकीला मोठा वाव आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अमेरिकेच्या दौऱ्यावरून परतल्यानंतर महाराष्ट्रात मोठी गुंतवणूक होणार, असे एका कार्यक्रमात बोलले होते. त्यामुळे महाराष्ट्रात हा प्रकल्प सुरू झाला तर, तो छत्रपती संभाजीनगरात सुरू होऊ शकतो. मराठवाड्यात पूर्वी मोठ-मोठे उद्योग होते. हळूहळू या उद्योगांना उतरती कळा लागली, त्यामागील कारणे देखील तशीच आहेत. मोठमोठे कारखाने चालविणे अवघड आहे. मराठवाड्यात हळूहळू का होईना रस्ते चांगले होत आहेत. पाण्याची कमतरता भरून निघाली तर, आणखी उद्योग तग धरू शकतात. मनुष्यबळ पुरेसे आहे. निष्णांत मनुष्यबळ उपलब्ध होणे, हे देखील तसे पाहिले तर, अशक्य नाही. सध्या मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगरबरोबर अन्य जिल्ह्यांतही उद्योग वाढीसाठी पोषक वातावरण आहे. लातूर व नांदेडच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर, या दोन्ही जिल्ह्यांच्या नेत्यांनी राज्याचे मुख्यमंत्रीपद भूषविले; परंतू ते दोघेही नांदेड किंवा लातूरला मोठे उद्योग आणू शकले नाहीत. एकेकाळी नांदेडला असलेली टेक्सकॉम, एनटीसी मिल प्रसिद्ध होती. त्यावेळी मराठवाड्यातून संपूर्ण देशभरात मोठा व्यापार होत होता; परंतु नंतर वेगवेगळ्या कारणांमुळे मराठवाड्यातील उद्योगविश्वाला उतरती कळा लागली. आजही मराठवाड्यात असलेल्या औद्योगिक वसाहतीत अनेक उद्योग बंद अवस्थेत आहेत. अनेक उद्योजकांनी उद्योग सुरू करायचा म्हणून केवळ जमिनी लाटून घेतल्या आहेत. मराठवाड्यात उद्योग न टिकण्यामागे वेगवेगळी कारणे असली तरी खंडणीखोर, अधून-मधून वेगवेगळ्या सण-उत्सवांनिमित्त लाखो रुपयांच्या वर्गण्या मागतात. यामुळे अनेक उद्योजक त्रस्त आहेत. याशिवाय नको त्या कारणाने आरटीई टाकून पैशांची मागणी करणारेही उद्योग पळवून लावत आहेत. कोण्या एका ठिकाणी उद्योग सुरू होणार आहे, असे कळल्यावर केवळ जागा मिळावी या उद्देशातून भूखंड माफिया जागा स्वतःच्या नावावर गुंतवून ठेवतात. उद्योग सुरू करायचा नाही, जागा दडवून ठेवायची. त्या जागेला काही वर्षांनंतर चांगला भाव आला की, ती जागा चढ्या भावाने दुसऱ्याला हस्तांतरीत करायची, या पद्धतीतून अनेक भूखंड माफिया करोडोपती झाले आहेत.शासनाने अशा भामट्या उद्योजकांना हाकलून लावावे. ज्यांनी ज्यांनी उद्योगाच्या नावाखाली जमिनी लाटल्या; परंतु त्यांनी उद्योग सुरू केले नाहीत, अशा लोकांना औद्योगिक वसाहतीतून बाहेर काढावे. जे खरोखर उद्योग उभारणार आहेत, अशांनाच जमिनी द्याव्यात व उद्योग वाढीसाठी त्यांना सोयी-सवलती देऊन मोठे करावे. तसे पाहिले तर, उद्योग उभारताना जे नियम व अटी घालून दिलेले असतात, ते अनेकदा कागदोपत्री पाळले जातात, प्रत्यक्षात त्या नियमांना नंतर पाहणारे देखील कानाडोळा करतात. या व अशा अनेक कारणांमुळे मराठवाड्यात किंबहुना महाराष्ट्रात उद्योग तग धरत नाहीत. उलट मोठ-मोठे उद्योग गुजरातला पळून गेले, अशी आरोळी ठोकली जाते व त्यावरून मोठे राजकारण केले जाते. गुजरातमध्ये उद्योगवाढीसाठी पोषक वातावरण आहे.

एक खिडकी माध्यमातून गुजरातला उद्योग उभारता येतो. तशीच पद्धत महाराष्ट्रात किंबहुना मराठवाड्यात अवलंबविल्यास नक्कीच मराठवाड्याला उद्योगाच्या बाबतीत अच्छे दिन येतील, असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. गुजरातमधील मोठमोठे उद्योजक परदेशात स्थायिक झालेत. त्यांनी विदेशात अब्जोवधी रुपयांचा उद्योग उभारला. परदेशात यशस्वी झालेल्या उद्योजकांमध्ये गुजरातमधील उद्योजकांची संख्या जास्त आहे. त्यामागे कारण देखील तसेच आहे. परदेशात उद्योग करत असताना कशाचीही भीती नाही. शासनाकडून परवानग्या लवकर मिळतात. उद्योग उभारायचा असेल तर कोणालाही टेबलाखालून 'अतिरिक्त' द्यायची गरज नाही. याशिवाय कुठल्याही प्रकारची भीती नसल्याने करोडो रुपयांचा व्यवहार खुलेआम होतो. तशीच पद्धत महाराष्ट्रात सुरू झाली, तर उद्योग टिकतील व ते वाढतील देखील. असो. नांदेड, बीड, परभणी, लातूर व हिंगोली या भागांत मोठे उद्योग उभारणे गरजेचे आहे. या भागांतील नेत्यांनी उद्योग वाढीसाठी लक्ष द्यावे. सध्या मराठवाड्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून रोजगार मेळावे भरविले जात आहेत. त्यामधून तरुण-तरुणींना नोकरी देण्याचे आमिष दाखविले जात आहे. वर्षानुवर्षे राजकारण करणाऱ्या नेत्यांनी कारखाने उभारणीसाठी प्रयत्न केले नाहीत. आता रोजगार मेळावे भरवून केवळ दुधाची भूक ताकावर भागविण्याचा प्रयत्नचालविला आहे.केवळ जमिनी लाटणाऱ्यांची शिफारस या नेत्यांनी करू नये. ज्यांना खरोखर उद्योग उभारायचा आहे, त्यांना खरी मदत मिळणे आवश्यक आहे. किमान अशा कामांत तरी राजकारण शिरता कामा नये. मराठवाड्यात एकूण आठ जिल्हे आहेत. त्यापैकी छत्रपती संभाजीनगर वगळता अन्य सात जिल्ह्यात कुठलाही मोठा उद्योग नसल्याने मराठवाड्यात बेरोजगारांचा प्रश्न उभा राहिला आहे. तो प्रश्न रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून नव्हे तर उद्योग उभारून तसेच मराठवाड्यातील तरुण वर्गाला हाताला काम देऊन सोडविता येऊ शकतो, याकडे मराठवाड्यातील नेत्यांनी लक्ष देणे अत्यंतगरजेचे आहे.

# ग्रामपंचायत सदस्यासह युवकांच मोबाईल टॉवर वर आंदोलन



**मानूर (प्रतिनिधी):** शिरूर कासार तालुक्यातील आर्वी या गावासाठी मंजूर जलजीवन पाणीपुरवठा योजनेचे काम नियमबाह्य होत असून योजना थातूरमातूर करून ग्रामस्थांच्या तोंडाला पान पुसण्याचा प्रकार चालू असल्याने ग्रामपंचायत सदस्यांकडून प्रशासनाला अल्टिमेटम देऊन मोबाईल टावर वर चढून आत्मदहन करण्याचा इशारा एक महिन्यापूर्वी प्रशासनाला दिला होता प्रशासनाकडून यावर कुठलेही कार्यवाही न केल्याने युवक आंदोलनावर ठाम राहिले व एक मार्च च्या रोजी सकाळी युवक टावर वर चढले होते.

बोगस जलजीवन पाणीपुरवठा योजनेची चौकशी करून योजना दर्जेदार करावी व योजनेतून टाळलेल्या वस्त्यांवर पाणीपुरवठा पाईपलाईन करावी या मागणीसाठी ग्रामपंचायत सदस्यांनी प्रशासनाच्या विरोधात आंदोलनाचे हत्यार उपसले होते एक मार्च रोजी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास ग्रामपंचायत मधील सदस्य गोपाल भुसारे, गणेश भोसले,अरुण देवकाते, बळीराम मंडलिक, बप्पासाहेब काळे, उपसरपंच अरुण कुंभारकर सह रामेश्वर नागरगोजे, आयुब शेख व नितीन घरगिने हे युवक मोबाईल टावर वर चढले होते तब्बल तीन तासानंतर प्रशासकीय अधिकारी या ठिकाणी दाखल झाले होते, आंदोलन स्थळावर सरपंच मीरा यादव, ग्रामसेविका सीमा खेडकर, शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गणेश धोकृट, बिट अंमलदार जोगदंड यांच्यासह नायब तहसीलदार शिवनाथ खेडकर हे सर्व अधिकारी सकाळी नऊ वाजल्यापासून आंदोलन स्थळावर तळ ठोकून होते. पावणे बारा वाजण्याच्या सुमारास प्रशासकीय अधिकारी या ठिकाणी आले व आंदोलकांची समजूत काढून लेखी आश्वासन देऊन आंदोलन मागे घेण्यात आले.आर्वी गावातील जलजीवन योजनेचे रखडलेले काम पूर्ण करण्यासाठी ग्रामीण पाणीपुरवठ्याचे उपअभियंता शेख एम.ए, सातपुते एन.बी,एल डी हूले, या अधिकाऱ्यांनी संबंधित गुत्तदाराला सूचना देऊन रखडलेले काम पूर्ण करण्यासाठी एक महिन्याचा अवधी आंदोलनकर्त्याकडून लेखी स्वरूपात घेतलेला आहे प्रशासकीय अधिकाऱ्यांनी एक महिन्याच्या आत गावचा पाणीपुरवठा सुरळीत करण्याची संमती यावेळी दिली. आर्वी ग्रामपंचायत चा कारभार जेष्ठ समाजसेवक दीपक नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे गावातील जलजीवन पाणीपुरवठा योजनेस संदर्भात चक्क ग्रामपंचायत सदस्यांना आंदोलनाची वेळ येत असेल तर प्रशासकीय अधिकारी करतात तरी काय असा सवाल ज्येष्ठ समाजसेवक दीपक नागरगोजे यांनी आंदोलन स्थळावर उपस्थित अधिकाऱ्यांना विचारून धारेवर धरले होते.

# शिवनाथ फुलझळके,ज्ञानेश्वर सगळे यांचा के.व्ही.के खामगांव तर्फे सन्मान

**जातेगाव (प्रतिनिधी):** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र खामगाव व महाराष्ट्र शासन कृषि विभाग गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२४ फेब्रुवारी रोजी पी.एम.किसान सन्मान निधी योजनेच्या १९ व्या हप्त्याचे वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता या मध्ये के,व्ही,के, व कृषी विभाग यांच्या मार्फत



प्रगतीशील शेतकरी आणि शेतकरी बंधूंसाठी उत्कृष्ट काम करणारे शेतकरीमित्र यांचा सन्मान करण्यात आले त्या मध्ये आहेर वाहेगाव येथील प्रगतिशील शेतकरी शिवनाथ फुल झळके यांनी तयार केलेल्या हरितक्रांती शेतकरी गटामार्फत महाराष्ट्र मधून प्रथम कापसाच्या गाठी तयार केल्या व त्यामधून गटाने पिकवलेला कापूस बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) अंतर्गत कापसाच्या गाठी बनवल्या व त्या महा कॉटन मार्फत ऑनलाइन विक्री केल्या आहे.आहेर वाहेगाव येथील या शेतकऱ्यांनी हा प्रयोग केला त्या गटाचे प्रमुख श्री शिवनाथ फुलझळके यांनी कृषी विज्ञान केंद्र खामगाव यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रथम कापसाच्या गाठी तयार केल्या त्याबद्दल कृषि विज्ञान केंद्र खामगाव यांच्या तर्फे त्यांच्या सन्मान करण्यात आला..

तसेच ज्ञानेश्वर यशवंत सगळे रा.बागपिंपळगाव ता.गेवराई जिल्हा बीड यांना सुद्धा कृषी विज्ञान केंद्र खामगाव यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई तालुक्या प्रथम मशरूम उत्पादक शेतकरी होण्याचा मान मिळवला त्यांनी खामगाव येथील कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञांचा सल्ला घेऊन मशरूमची लागवड करण्याचा निर्णय घेतला.त्यांचा असा विश्वास होता की पारंपारिक शेती या ऐवजी आधुनिक शेती मध्ये काहीतरी नवीन व्यवसाय करावा व सध्याच्या कृषी व्यवस्थेला पूरक ठरेल आणि त्यांचे वार्षिक उत्पन्न वाढेल.म्हणून ज्ञानेश्वर सगळे यांनी केव्हीके खामगांव यांच्या मार्गदर्शनाखाली मशरूम लागवडीवरील व्यावसायिक प्रशिक्षण घेतले.त्यांनी त्यांच्या शेतात एक मशरूम युनिट स्थापन केले, व गेल्या वर्षी जुलै पासून मशरूम उत्पादन ते कृषी विज्ञान केंद्र खामगाव व ता.कृषी विभाग यांचे या मधून त्यांना बहिणीला पंधरा ते वीस हजार रुपये ते मिळवतात या बद्दल ज्ञानेश्वर सगळे व शिवनाथ फुलझळके यांचे श्री.सुभाष साळवे साहेब जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी बीड केव्हीके खामगावचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ.हनुमान गरुड साहेब, तालुका कृषी अधिकारी श्री.अभय कुमार वडकुते साहेब यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले एक वेळी उपस्थित गेवराई तालुका कृषी अधिकारी श्री.अभय वडकुते साहेब,तंत्र अधिकारी श्री हर्षवर्धन खेडकर मंडळ अधिकारी माळी मॅडम,मस्के मॅडम तसेच शेतकरी बांधव यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# अतिक्रमण पाडल्याने छोट्या व्यावसायिकांचे संसार झाले उध्वस्त

## शहरात पर्यायी जागा देण्याची मागणी

**गेवराई (प्रतिनिधी):** गेवराई शहरातील जालना रोडवरील अतिक्रमण पाडण्यात आल्याने या रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला खरा. परंतु दुकाने जमीनदोस्त केल्याने हातावर पोट असणाऱ्या गोरगरीब व्यावसायिकांचे संसार उद्धस्त झाले असून त्यांच्यावर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली आहे. त्यामुळे अशा गोरगरीब व्यावसायिकांना नगर परिषदेने शहरात पर्याय जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी होत आहे.गेवराई शहरात अनेक वर्षांपासून बीड-जालना रस्त्यांच्या दुतर्फा गोरगरीब व्यावसायिक आपली छोटी छोटी दुकाने थाटून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. त्यात चहा, सलून, स्टेशनरी, मोबाईल शॉपी, मोटारसायकल दुरुस्ती अशा दुकानांचा समावेश होता.याच व्यवसायावर घरातील कुटुंबांचा उदारनिर्वाह चालू असताना अचानक अतिक्रमणांवर पडलेला हातोडा म्हणजे त्यांच्या काळजावर घाव घातल्यासमान झाला आहे. वर्षानुवर्षे तळहाताप्रमाणे जपलेला व्यवसाय नगर पालिकेच्या जेसीबीने काही क्षणात जमीनदोस्त केला आहे. व्यवसायासाठी काढलेले कर्ज, राहत्या घरासाठी कर्ज अशा कर्जबाजारीपणाचा विचार न करता बांधकाम पाडताना पाडणारे हसतात. मात्र, त्याचे धनी रडतात, हा कुठला न्याय असाच काहीसा प्रश्न उपस्थित होत आहे. तरी देखील अतिक्रमणधारकांनी गेवराई नगरपालिकेचे मुख्याधिकारी व गेवराई पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना विनंती करुन आम्हाला काही तासांची मोहलत द्यावी कर्ज घेवून बांधलेले शेड काढून नेतो, अशा विनवण्या करुन देखील जसे काही लोकशाही संपल्यासारखे कोणतीही महलत न देता अधिकाऱ्यांनी मुजोरपणा दाखवून गोरगरिबांच्या दुकानांचे लाखो रुपयांचे नुकसान केल्याने संताप व्यक्त केला जात आहे.गेवराई शहरातून जात असलेल्या रस्त्यासाठी मोकळी जागा हवी हे खरे असले तरी सरसकट अतिक्रमणाच्या नावाखाली छोट्या व्यावसायिकांचे नुकसान टाळता आले असते. त्यांच्या रोजी रोटीचा विचार होणे अत्यंत आवश्यक होते. व्यवसायासाठी त्यांना पर्यायी जागा देऊन आवश्यक तेवढेच अतिक्रमण हटविले असते तर काहीसा रोष कमी होण्यास मदत होऊ शकली असती.

## मी १०० टक्के रायगडचा पालकमंत्री होणार

# मंत्री भरत गोगावले यांचा विश्वास;लवकरच तोडगा निघेल

**मुंबई (वृत्तसंस्था)**–मी १०० टक्के रायगड जिल्ह्याचा पालकमंत्री होणार, असा आत्मविश्वास शिवसेनेचे आमदार आणि मंत्री भरत गोगावले यांनी व्यक्त केला. ते आज विधानभवनात माध्यमांशी बोलत होते. कुणीतरी बालहट्ट सोडावा, बालहट्ट सोडला तर एका मिनिटात निर्णय होईल, असा टोलाही आदिती तटकरे यांना नाव न घेता लगावला.



सरकारकडून पालकमंत्र्यांची घोषणा केल्यानंतर आदिती तटकरे यांच्याकडे रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री पद गेले होते. परंतु, यामुळे शिवसेनेचे आमदार भरत गोगावले नाराज झाले. त्यानंतर सरकारने रायगडच्या पालकमंत्री पदाच्या नियुक्तीला स्थगिती दिली होती. तेव्हापासून हा तिढा कायम आहे. शिवसेनेचे आमदार भरत गोगावले यांनी रायगडच्या पालकमंत्री पदावर दावा केला आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेसही या जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदासाठी दावा सांगत आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. आज भरत गोगावले यांनी केलेल्या दाव्यामुळे तीन महिन्यांपासून रखडलेला रायगड जिल्ह्याचा पालकमंत्रिपदाचा वाद लवकरच सुटण्याची शक्यता आहे.रायगडच्या पालकमंत्रिपदाबाबत नक्कीच तोडगा निघेल, असा विश्वास शिवसेनेचे आमदार भरत गोगावले यांनी व्यक्त केला. रायगडच्या पालकमंत्रिपदाचा चेंडू मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कोर्टात टाकला आहे. त्यावर तिघे जण बसून तोडगा काढतील, असेही ते म्हणाले. मी १०० टक्के रायगड जिल्ह्याचा पालकमंत्री होणार, आम्ही एक टक्का पण कमी नाही बोलत, असा आत्मविश्वास गोगावले यांनी यावेळी व्यक्त केला. पालकमंत्री पदाच्या निर्णयाबाबत संध्याकाळापर्यंत वाट पाहावी, तेव्हा सगळे समजेलच, असेही ते म्हणाले. कुणीतरी बालहट्ट सोडावा, बालहट्ट सोडला तर एका मिनिटात निर्णय होईल, असा टोलाही आदिती तटकरे यांना नाव न घेता लगावला.दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काल रायगड जिल्हा दौऱ्यावर होते. यावेळी त्यांच्याबरोबर शिवसेना नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे देखील होते. या दोघांनी सुरुवातीला महाड येथील चवदार तळ्याला भेट दिली. त्यानंतर पुढील कार्यक्रमाला जाताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री भरत गोगावले आणि मंत्री आदिती तटकरे यांना एकाच वाहन घेत प्रवास केला. हा प्रवास चर्चेचा विषय ठरला होता. या प्रवासात रायगडच्या पालकमंत्रिपदाबाबत चर्चा झाली असणार, असा अंदाज बांधला गेला होता.त्यानंतर महाडमधील दिवाणी न्यायालयाच्या कोनशिला समारंभानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पालकमंत्रिपदाच्या तिढ्याबाबत विचारले असता मी, एकनाथ शिंदे आणि अजित पवार असे तिघे रायगडचे पालकमंत्री आहोत, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. यावरून पालकमंत्री पदावर अजून तोडगा निघाला नसून शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या जोरदार रस्सीखेच सुरू असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## स्वारगेट बलात्कार प्रकरणावर सुप्रिया सुळेंचा संताप

# महिला सुरक्षेकडे सरकारचे दुर्लक्ष असल्याचा आरोप, फास्टट्रॅक कोर्टात खटला चालवण्याची मागणी

**पुणे (वृत्तसंस्था)**–राज्यात महिला सुरक्षितता ही महत्वाची आहे, पण राज्य सरकार त्याकडे दुर्लक्ष करत आहे. राजकारण बाजूला ठेवून गंभीर केस मध्ये तपास योग्य झाला पाहिजे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली.

सुळे म्हणाल्या, स्वारगेट येथे २६ वर्षीय तरुणीवर बस मध्ये घडलेली घटना दुर्दैवी आहे. महाराष्ट्रात महिला सुरक्षा धोक्यात आलेली आहे. प्रचंड गुन्हेगार राज्यात वाढली असून यात महिलांवरील अत्याचार मोठ्या प्रमाण वाढलेले आहेत. चाकण मध्ये पोलिस अधिकारी यांच्यावर कोयत्याने हल्ला झाला, केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या मुलीची छेडछाड हे गंभीर प्रकरण आहे. स्वारगेट केस योग्य प्रकारे हाताळली गेली नाही. सरकारने संवेदनशील राहणे आवश्यक आहे, अशावेळी पदावर असणाऱ्या व्यक्तीने जबाबदारीने बोलणे आवश्यक आहे, अशी टीका सुप्रिया सुळे यांनी गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्यावर केली. ज्या दिशेला या केसचे प्रकरण नेऊन दिशाभूल केली जात आहे.बदलापूर घटना झाल्यावर आम्ही ठोस उपाययोजना कराव्यात असे सांगण्यात आले. ही केस फास्टट्रॅक न्यायालयात चालवून त्याला जाहीर फाशी दिली पाहिजे, अशी मागणी सुप्रिया सुळे यांनी केली. ही




बाब धक्कादायक आहे की, या प्रकरणात बेजबाबदार वर्तन आणि वक्तव्य करणाऱ्यांवर कारवाई केली जात नाही. ज्या लाडक्या बहिणीला चिंता वाटून मोठी यंत्रणा निवडणूक पूर्वी राबवली गेली. पण नंतर त्यांना वाऱ्यावर सोडले गेले आहे, असा आरोप सुळे यांनी महायुती सरकारवर केला. महिला बाबत आक्षेपार्ह आणि बदनामीकारक वक्तव्य करणाऱ्यांनी माफी मागावी अन्यथा आम्ही संबंधितांच्या घराबाहेर आंदोलन करू, असा इशारा सुप्रिया सुळे यांनी यावेळी दिला.बीड हा कष्टकरी यांचा जिल्हा आहे पण गलिच्छ राजकारणामुळे देशात पुणे आणि बीड यांचे नाव बदनाम झाले आहे. अनेक गुन्हे करून ही वाल्मीक कराड आणि त्यांचे आका यांनी कोणती गोष्ट सरकारला दिली, ज्यामुळे त्यांच्यावर कारवाई होत नाही? असा सवाल सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला. ओएसडी आणि खासगी सचिव ठेवताना मुख्यमंत्री हे मंत्री यांना अधिकार न देता त्यावर हक्क गाजवत आहे. मंत्री हे लोकप्रतिनिधी आहेत, असेही त्या म्हणाल्या.

# महापुरुषांचा अवमान करणाऱ्या विरोधात राज्य सरकारने कडक कायदा आणावा:अमोल मिटकरींची मागणी

**मुंबई (वृत्तसंस्था)**–अर्थसंकल्पीय अधिवेशनात सर्वात प्रामुख्याने मुद्दा हा शेतकऱ्यांच्या समस्या संदर्भात असणार आहे. तसेच अलीकडच्या काळात छत्रपती शिवाजी महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी राजे यांच्या बद्दल गरळ ओकणारी प्रवृत्ती निर्माण झाली आहे. यात राहुल सोलापूरकर असो किंवा प्रशांत कोरटकर असो. अशा प्रवृत्तीला चाप लावण्याकरता, कठोर कायदा करून त्यांना तात्काळ जेल बंद करावे, अशी मागणी आपण अधिवेशनात करणार असल्याचे आमदार अमोल मिटकरी यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

या वेळी मिटकरी यांनी प्रशांत कोरटकर यांचाही चांगलाच समाचार घेतला. ते म्हणाले की, प्रशांत कोरटकरने दिलगिरी व्यक्त न करता, माफी न मागता, एखादा चोर डल्ला टाकल्यानंतर स्वतःला उजागर समजतो. त्या पद्धतीने वर्तन केले आहे. ते खपवून घेतले जाणार नसल्याचे मिटकरी यांनी म्हटले आहे. मोबाईल जप्त केला आणि माझा आवाज नसल्याचा दावा त्याचा असला तरी पोलिसांनी त्याचाच आवाज असल्याचे सिद्ध केले आहे. त्यामुळे अशा प्रकारे महापुरुषांचा अवमान करणाऱ्या विरोधात राज्य सरकारने कडक कायदा आणावा, यासाठी मुख्यमंत्र्यांना विनंती करणार असल्याचे मिटकरी यांनी म्हटले आहे. याच विषयावर अर्धा तास चर्चा होणार असल्याची माहिती देखील मिटकरी यांनी दिली आहे.

# सुधीरभाऊ मुनगंटीवार युथ क्लब द्वारा आयोजीत क्रिकेट स्पर्धेचे बक्षीस वितरण

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील खेळाडू तसेच तरुण, तरुणी कुठल्याही क्षेत्रात मागे राहू नयेत यासाठी त्यांच्याकरिता विविध प्रकारच्या सुविधा निर्माण करण्यात आलेल्या आहेत. खेळाडूंच्या प्रगतीसाठी स्टेडियम तसेच क्रिडांगणांचा विकास करण्यात आलेला आहे. खेळाडूंनी आपापल्या क्षेत्रात पुढे जावे, मी सदैव तुमच्या पाठीशी पूर्ण शक्तीने उभा आहे, अशी ग्वाही राज्याचे माजी सांस्कृतिक कार्य, मत्स्य व्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी खेळाडूंना दिली.

बल्लारपूर येथे सुधीरभाऊ मुनगंटीवार युथ क्लब द्वारा आयोजित भव्य क्रिकेट स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाला भाजपाचे जेष्ठ नेते चंदनसिंह चंदेल, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, काशीनाथ सिंह, मनीष पांडे, निलेश खरबडे, शिवचंद द्विवेदी, ड. रणंजय सिंग, नरेंद्रसिंग दारी, श्रीनिवास जंगम, अथर्व तन्नीरवार, सूरज पेदुलवार, प्रज्वलंत कडू, तिवारी , राजेश्वर सुरावार, रेणुकाताई दुधे, वैशालीताई जोशी आणि भाजपा पदाधिकारी, खेळाडू आदींची उपस्थिती होती.देशाच्या क्रिकेट संघात बल्लारपूरातील खेळाडू खेळावेत, अशी अपेक्षाही आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी व्यक्त केली. ते म्हणाले, बल्लारपूर कोणत्याच क्षेत्रात मागे नाही. मुंबईतील खेळाडूंपेक्षा आपले खेळाडू कमी नाही. प्रत्येक क्षेत्रात आपले मुले पुढे जावेत यासाठी शिक्षण क्षेत्रात मेडिकल कॉलेज, गोंडवाना विद्यापीठ, कृषी विद्यापीठ, देशातील एसएनडीटी विद्यापीठ, सैनिक शाळा, मूल मध्ये येणारे पॉलिटेक्निक कॉलेज या बाबतीत विकास होत आहे. यासोबतच देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी हे खेळाला प्रोत्साहन देत आहेत. त्यादृष्टीने बल्लारपूरातही खेळाचा विकास व्हावा यासाठी १ कोटी ७९ लाख रुपये खर्च करुन मैदान विकसीत करण्यात आले. आ.मुनगंटीवार पुढे म्हणाले,संपूर्ण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा विसापुर येथील स्टेडियमवर झाल्या. या स्टेडियमचे सर्व स्तरातून कौतूक झाले. या कार्यक्रमाला केंद्रीय क्रीडा राज्य मंत्री रक्षाताई खडसे उपस्थित होत्या. त्यांनी येथील स्टेडियमचे विशेष कौतुक केले. पुणे नंतर आपले बॅडमिंटन कोर्ट सर्वोत्तम, स्मार्ट सिंथेटिक ट्रॅक फक्त चंद्रपूर जिल्ह्यात आहेत. विसापूर येथील स्टेडियमध्ये धनुर्विद्याकरिता सुविधा निर्माण होत आहेत. मिशन शौर्यच्या माध्यमातून आपले मुले एव्हरेस्ट चढले. अशा स्पर्धांच्या माध्यमातून लक्ष्य प्राप्त करण्याचे मार्ग निर्माण करायचे आहेत. मिशन ऑलिम्पिक २०३६ सुरु करण्यात आले आहे. मात्र यात आर्थिक अडचणी येत असलेल्या खेळाडूंसाठी विशेष सुविधा निर्माण करण्यात येत आहेत. २०३६ मध्ये ऑलिम्पिकमध्ये चंद्रपूरमधील युवक, युवती पदक नक्की प्राप्त करतील, असा विश्वासही आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. इनडोअर आंतरराष्ट्रीय स्टेडियम १६ एकर जमिनीवर साकारले जात आहे. हे महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट स्टेडियम असेल. १० बॅडमिंटन कोर्ट असेल, व्हॉलिबॉल मैदान राहतील. आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धा होतील, अशा स्वरुपाचे हे इनडोअर स्टेडियम असेल, असेही आ.मुनगंटीवार म्हणाले. काही महिन्यांपूर्वी राष्ट्रीय स्तरावरील १९ वर्षाखालील खेळाडूंची स्पर्धा घेतली. या स्पर्धेच्या आयोजनाचे कौतुक करण्यासाठी केरळ येथील खेळाडूंच्या पालकांनी फोन केल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. स्व. सुषमा स्वराज यांच्या नावाने मुलींसाठी कौशल्य विकास केंद्र सुरु केले. फ्लाईंग क्लब सुरु करण्यात आले असून प्रशिक्षणासाठी फक्त २ लक्ष रुपये शुल्क ठेवण्यात आले आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील युवक, युवतींच्या विकासासाठी सदैव तत्पर असून तरुणांनो आपल्या क्षेत्रात पुढे जाण्याची तयारी ठेवा, असे आवाहनही आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केले. न्यू टारगेट क्रिकेट क्लब बल्लारपूर संघाने स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. विजेत्या संघाला १ लक्ष रुपये प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आले. रिवेंज क्रिकेट क्लब दुर्गापूर संघाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. संघाला ५१ हजार रुपये रोख बक्षीस प्रदान करण्यात आले. राईस सिटी क्रिकेट क्लब मुल संघाने ३१ हजार रुपये तृतीय पुरस्कार प्रदान करण्यात आले.


# बोरीसारगाव येथे सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धेतील गटांचा स्नेह मेळावा

**केज । प्रतिनिधी**
तालुक्यातील बोरीसावरगाव येथे सत्यमेव जयते फार्मर कप स्नेह मेळावा मंगळवार रोजी संपन्न झाला.कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच वैजनाथ देशमुख, प्रमुख मार्गदर्शक पानी फाउंडेशनचे मराठवाडा समन्वयक संतोष शिनगारे,प्रमुख उपस्थिती उपसरपंच बाळासाहेब यादव, डॉ हनुमंत सौदागर आदींची होती. सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धेत तालुक्यातून उत्कृष्ट काम करणाऱ्या शेतकरी गटांचा उपस्थितांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना संतोष शिनगारे म्हणाले ज्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला.ते सर्वच गट जिंकलेलो आहात. सर्व गटांचा उत्साह यांच्या चेहऱ्यावर विजय दाखवत आहे असे मत व्यक्त केले. सेंद्रिय आणि विषमुक्त अन्न ही काळाची गरज असल्याचे मत डॉ सौदागर यांनी व्यक्त केले. स्नेह मेळाव्यासाठी बहिणाबाई महिला शेतकरी गट दिपेवडगाव,राजमाता जिजाऊ महिला शेतकरी गट लाडेगाव,संघर्ष महिला शेतकरी गट लाडेगाव, ज्ञानेश्वरी महिला शेतकरी गट लाडेगाव, आदिशक्ती महिला शेतकरी गट चंदनसावरगाव ,भुमिपुत्र शेतकरी गट चंदन सावरगाव ,कृषीसखी महिला शेतकरी गट चंदन सावरगाव जय किसान महिला शेतकरी गट कानडी बदन ,जय किसान पुरुष शेतकरी गट कानडी बदन, दत्तकृपा महिला शेतकरी गट , हिरकणी महिला शेतकरी गट आडस, माऊली शेतकरी गट आडस, उत्तरेश्वर महिला शेतकरी गट हनुमंत पिंपरी सावित्रीबाई फुले महिला शेतकरी गट बोरीसावरगाव, शंभु महादेव शेतकरी गट बोरीसावरगाव ,तृण अंकुर शेतकरी गट पाथरा आदी शेतकरी गटांचा सन्मान करण्यात आला. यावेळी गटातील शेतकऱ्यांना आलेले सुंदर अनुभव कथन करण्यात आले. महिला शेतकरी गटांनी उत्स्फूर्तपणे अनुभव कथन करताना शेतीत आनंदाने काम केले असल्याचे अनुभव सांगितले. उत्पादन वाढले हेच सर्वात मोठे बक्षीस असल्याचे प्रतिक्रिया गट सदस्यांनी दिल्या. पानी फाउंडेशनचे नितीन पाटोळे,सिद्धार्थ गवळे,महेश गूळभिले उपस्थित होते कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रशिक्षक विनोद ठोंबरे, तालुका समन्वयक हरिश्चंद्र पांचाळ यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमास गटातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते .



# नित्रुड येथे गायकवाड, काशीद व आगे सन्मानित; दीप इंग्लिश स्कूलच्या वतीने गौरव

**किट्टिआडगाव । प्रतिनीधी**
नित्रुड येथील बाजीराव गायकवाड हे भारतीय टपाल सेवेतून निवृत्त झाले आहेत. तर ग्रामीण बीड जिल्हा उपाध्यक्षपदी नुकतीच दिंद्रुड येथील ज्येष्ठ पत्रकार प्रकाशराव काशिद यांची निवड झाली आहे. तसेच महाराष्ट्र शासन अंगीकृत माविमच्या वतीने किट्टी आडगाव येथील वर्षा रामराव आगे यांना बचत गटासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल नुकतेच पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. उपरोक्त तिघांचाही दीप इंग्लिश स्कूल व दीप मॅन्युफॅक्चरिंग युनिट च्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडूजी खांडेकर होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार संतोष स्वामी, रामराव आगे, गणेश काटकर,



ज्ञानोबा कटारे शिवराज फाटे आदींची उपस्थिती होती.

बाजीराव गायकवाड यांनी नित्रुड येथील पोस्ट ऑफिस मध्ये शाखा पोस्ट मास्तर या पदावर ४५ वर्ष निर्विवाद सेवा केली आहे. मनमिळाऊ, मितभाषी व सेवेत नेहमी तत्पर असलेले गायकवाड सेवेप्रती एकनिष्ठ असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. तसेच पत्रकारीते मध्ये २५ वर्ष सकारात्मक पत्रकारिता करून अनेक गरजवंतांना न्याय मिळवून देण्याचे काम प्रकाश काशीद यांनी केल्याचे गौरवोद्गार मान्यवरांनी काढले. महाराष्ट्र शासन अंगीकृत असलेल्या महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्या वतीने नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पांतर्गत तेजस्विनी महिलांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये वर्षा रामराव आगे यांचा उत्कृष्ट उद्योजक म्हणून मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. उपेक्षित घटकातील महिलांना संघटित करून बचत गटाच्या माध्यमातून त्यांच्या जीवनात आनंद फुलविणाऱ्या वर्षा आगे त्यांचेही सर्वांनी तोंड भरून कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीप इंग्लिश स्कूलचे प्राचार्य चव्हाण यांनी केले तर. प्रस्ताविक व आभार संस्थेच्या अध्यक्षा संजीवनी राऊत यांनी मानले. यावेळी सत्कारमूर्तींनी सत्कारास उत्तर दिले. कार्यक्रमास मनसेचे पांडुरंग जाधव, दिनेश गायकवाड, रामचंद्र आढाव, वैजनाथ लव्हाळे, पोपट आढाव, राम होळकर, सारिका गायकवाड यांच्यासह गावातील प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती.

# शिरूर कासारच्या भूमिपुत्राची झाली केंद्रीय पोलीस दलामध्ये निवड



**शिरूर कासार । प्रतिनिधी**
शिरूर येथील नंदकुमार शेळके यांचा मुलगा प्रवीण नंदकुमार शेळके हा गेलीअनेक दिवसापासून प्रयत्नशील होता शेवटी त्या प्रयत्नांना आज यश मिळाले आणि तो नागपूर येथे सीआरपीएफ मध्ये रुजू झाला.

प्रवीण शेळके यांच्या निवडीचा आनंद उत्सव या ठिकाणी करण्यात आला त्यावेळी त्यांचे मित्र तसेच नगरपंचायत चे प्रथम नगराध्यक्ष तथा नगरसेवक यांनी शिरूर कासार शहराच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी उपस्थित प्रथम नगराध्यक्ष श्री.रोहिदास पाटील गाडेकर, अरुण भालेराव, डॉक्टर. भगवान सानप, गणेश तळेकर,गटनेते गणेश बाप्पा भांडेकर, दत्ता पाटील गाडेकर, भागवत थोरात,नजीरभाई शेख, दादासाहेब हरिदास, अन्वर भाई शेख, युवा नेते प्रताप कातकडे, बाळासाहेब हरिदास, भास्कर गाडेकर आदींच्या उपस्थितीत यावेळी सत्कार करण्यात आला.

# अन्नत्याग आंदोलनात किसानपुत्रांनी सहभाग घ्यावा-अमर हबीब

**अंबाजोगाई (प्रतिनिधी):** या वर्षीही शेतकरी आत्महत्या मोठ्या प्रमाणात होत आहेत म्हणून किसानपुत्र आंदोलनच्या वतीने १९ मार्च रोजी करण्यात येणाऱ्या अन्नत्याग आंदोलनात किसानपुत्रांनी अधिकाधिक सहभागी व्हावे, असे आवाहन किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब यांनी केले.किसानपुत्र आंदोलनच्या वतीने अंबाजोगाई येथे १९ मार्च रोजी अन्नत्याग आंदोलना निमित्ताने आयोजित करण्यात येणाऱ्या उपक्रमांच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत अमर हबीब बोलत होते.

अमर हबीब पुढे म्हणाले की, देशातील ९० टक्के लोक शेतीवर अवलंबून असतांनापासुन शेतकरी आत्महत्या सुरु आहेत. तेंव्हापासून आजपर्यंत आर्थिक विवंचनेतून शेतकरी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करीत आहेत. आज शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांचे प्रमाण ९० टक्क्यांवरुन दहा ते पंधरा टक्क्यांवर आले आहे, मात्र शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण काही कमी झाले नाही, हे भीषण वास्तव चित्र आहे.किसानपुत्र आंदोलनाच्या वतीने आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांप्रति सहवेदना व्यक्त करण्यासाठी मागील नऊ वर्षांपासून किसानपुत्र आंदोलन १९ मार्च रोजी अन्नत्याग आंदोलन राबवित आहे. अंबाजोगाई येथे हा उपक्रम गेली आठ वर्षांपासून अतिशय चांगल्या पद्धतीने सुरु असून यावर्षी स्थानिक



संयोजन समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमांत किसानपुत्रांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अमर हबीब यांनी केले. बैठकीच्या प्रारंभी संयोजक सुदर्शन रापतवार यांनी १९ मार्च रोजी आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यामध्ये १९ मार्च रोजी सकाळी सामुहिक उपवास, सहवेदना रॅली, शेतकरी सहवेदना पुरस्कार, आत्महत्याग्रस्त शेतकरी बहिणींचा साडीचोळी देऊन सन्मान, शेतकरी आत्महत्या कारणे आणि मिमांसा या विषयावरील व्याख्यान आणि सामुहिक उपवास सोडण्याचा कार्यक्रम यांच्या संपुर्ण नियोजनाची माहिती दिली.या कार्यक्रमात अंबाजोगाई तालुक्यातील आत्महत्याग्रस्त कुटुंबातील बहिणींचा सहभाग जास्तीत जास्त कसा करुन घेता येईल यासाठी ॲड. संतोष पवार यांनी माहिती दिली तर आत्महत्याग्रस्त शेतकरी बहिणीच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन संबंधीची माहिती शेतकरी संघटनेचे नेते कालिदास आपेट यांनी दिली. या बैठकीत अच्युत बापु गंगणे, वसंतराव मोरे, अनिता कांबळे, अनिरुद्ध चौसाळकर, प्रा. शांती नाथ बनसोडे, मदन परदेशी, महावीर भगरे यांनी उपयुक्त सूचना केल्या.नगर परिषद परीसरातील पत्रकार कक्ष येथे आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीस अमर हबीब, कालिदास आपेट, प्रा. शांतिनाथ बनसोडे, मुजीब काजी, अनिरुद्ध चौसाळकर, अच्यूत गंगणे, मदन परदेशी, संतोष बोबडे महावीर भगरे, व्यंकटेश जोशी, वसंत मोरे, इस्माईल शेख, लखन होके, कल्याणराव भगत, रेखा देशमुख, किरण देशमुख, अनिता कांबळे, प्रतिभा अवचर, दत्तात्रय अंबेकर, ॲड. माणिकराव बावणे व इतर मान्यवर उपस्थित होते.

# व्हिजन क्रीडा संकूलाचा मान्यवरांच्या उपस्थितीत शुभारंभ

**अंबाजोगाई (प्रतिनिधी):** श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळा अंतर्गत न्यू व्हिजन पब्लिक स्कूल मध्ये व्हिजन क्रीडा संकूलाचा शुभारंभ जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्याधर यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्तिथीत करण्यात आला. राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून न्यू व्हिजन पब्लिक स्कूल येथे विद्यार्थ्यांसाठी व्हिजन क्रीडा संकूलाचे शानदार उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक राजकिशोर मोदी, मार्गदर्शक प्रा. वसंत चव्हाण ,प्राचार्य रेंजो आर चंद्रन,प्रा राजमाने, ॲड संतोष पवार, प्राचार्य संतोष तरके हे उपस्थित होते.


कार्यक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी शिक्षणाची देवी माता सरस्वती च्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. आपल्या प्रास्ताविकात प्राचार्य रेंजो आर चंद्रन यांनी संस्था विद्यार्थ्यांसाठी चालवत असलेल्या विविध उपक्रमाबद्दल माहिती दिली. संस्थापक राजकिशोर मोदी तथा संचालक संकेत मोदी यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली संस्था अतिशय उत्कृष्ट रित्या कार्यरत आहे. दरवर्षी संस्थेतून हजारावर विद्यार्थी आपले शिक्षण पूर्ण करून बाहेर पडतात. यातील अनेक विद्यार्थी देशभरात विवीध उच्च पदावर कार्यरत आहेत. तसेच अनेक विद्यार्थी क्रीडा, तथा साहीत्य यांच्या माध्यमातून आपले नाव उज्वल करत




असल्याचे प्राचार्य आर चंद्रन यांनी सांगितले.

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक राजकिशोर मोदी यांनी देखील आपले मनोगत यावेळी व्यक्त केले. न्यू व्हिजन पब्लिक स्कूल ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी सतत प्रयत्नशील असते .विद्यार्थ्यांचा मानसिक विकास व शारीरिक विकास होण्यासाठी विद्यार्थ्यांना इनडोर तसेच मैदानी खेळ खेळणे अत्यंत आवश्यक असल्याचे राजकिशोर मोदी यांनी स्पष्ट केले. सध्याची पीढी ही मोबाईलवेढी झालेली आहे. यातून बाहेर पडण्यासाठी खेळ गरजेचे आहे हे लक्षात घेऊन कार्यकारी संचालक संकेत मोदी यांच्या संकल्पनेतून आज शाळेत व्हिजन क्रीडा संकूलाची सुरुवात करताना अतिशय आनंद होत असल्याचे मोदी यांनी नमुद केले. या क्रीडा संकूलात फूटबॉल , क्रिकेट , अथेलेटिक्स , बॉक्सिंग , बास्केट बॉल आणि स्केटींग या क्रीडा प्रकाराचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे .या व्हिजन क्रीडा संकुलाच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्याधर यांनी श्री बालाजी शिक्षण प्रसारक संस्था ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवित असलेल्या अनेक उपक्रम पाहून समाधान व्यक्त केले. आजकाल अनेक शैक्षणिक संस्था या क्रीडा मैदानाशिवायच विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करतांना आढळून येतात. पण न्यू व्हिजन पब्लिक स्कुल येथे विद्यार्थी मोठया प्रमाणावर मैदानी क्रीडा स्पर्धा आयोजित करत असून ते विद्यार्थ्यांसाठी अतिशय उपयुक्त अशी बाब असल्याचे सांगितले. याबाबत संस्थेचे संस्थापक राजकिशोर मोदी व त्यांच्या संपूर्ण सहकाऱ्यांचे अभिनंदन केले. यावेळी कराटे प्रशिक्षक शारदा प्रसाद साहू ,उद्योजक धनराज सोळंकी , डॉ . कमलाकर कांबळे , शालेय पालक समितीच्या सदस्या श्रीमती सविता बुरांडे , डॉ. अर्चना थोरात , डॉक्टर हिरा बजाज ,प्राचार्य हिरामण पुजडेकर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यार्थी , शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले .

# एकाच आठवड्यात तीन वेगवेगळ्या ठिकाणी पिल्लांची आई सोबत पुनर्भेट करण्यात श्रीगोंदा वनविभाग व इको रेस्क्यू टीम ला यश !



**श्रीगोंदा । गणेश गाडेकर**
जानेवारी पासून संपूर्ण महाराष्ट्रात ऊसतोडी चालू होते याच वेळी अनेक वन्यप्राण्यांनी पिल्ले ऊसतोडी दरम्यान आढळून येतात असाच प्रकार श्रीगोंदा परिसरात घडून आला गेल्या ५ दिवसात वेळवेगळ्या ठिकाणी कोल्हा तसेच बिबट्याची पिल्ले ऊसतोडी दरम्यान आढळून आली अशी पिल्ले पुन्हा आई जवळ सोडणे अत्यंत महत्त्वाचे व आव्हानात्मक असते मादी चिडखोर होऊ नये म्हणून पिल्ले तिच्याजवळ सुरक्षित जाण्यासाठी आधुनिक कॅमेऱ्याच्या मदतीने पुनर्भेट घडवण्यात श्रीगोंदा वनविभागाला व इको रेस्क्यू टीमला यश आले श्रीगोंदा तालुक्यात सर्वत्रच ऊस क्षेत्र मोठ्या प्रमाणात आहे श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी भागात मधील शिंदे माळा परिसरातील शेतकरी राम किसन शिंदे व निलेश जठार यांच्या शेतात बिबट्याचे एक पिल्लू उसतोडीत आढळून आले त्यांनी वनविभागाशी संपर्क करून माहिती दिली श्रीगोंदा वनविभाग व दौंड येथील इको रेस्क्यू टीम यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली व आधुनिक ट्रॅप कॅमेरे लाऊन आई व पिल्लाची यशस्वी पुनर्भेट घडवून आणली बिबट्या पाठोपाठ बेलवंडी परिसरातील काळाणे वस्ती जवळील शिवाजी काळाणे व यांच्या शेतात ऊसतोडी दरम्यान कोल्ह्याची चार पिल्ले आढळून आली यांचे देखील पुनर्भेट प्रक्रिया यशस्वी पार पाडण्यात वनविभागाला यश आले एकच आठवड्यातील तिसरे श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण परिसरातील कोकाटे वस्ती येथे संतोष बनकर व उपसरपंच अनिल बनकर यांच्या शेतातील ऊसतोडी दरम्यान बिबट्याची दोन पिल्ले आढळून आली रात्री ट्रॅप कॅमेरे लावून पाहणी केली व ही देखील पुनर्भेट यशस्वी झाली या वेळी वनपरिक्षेत्र अधिकारी प्रा सौ.दिपाली भगत मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक चंद्रकांत मरकड,वनरक्षक दिनेश हुंबरे,वनमजूर लक्ष्मण लगड,हनुमंत रणदिवे,भरत पवार,कचरू शेख,संभाजी शिंदे,विकास चोरमले तसेच अनेक प्रसंगी श्रीगोंदा वनविभागाला मदतीस असणारी दौंड येथील इको रेस्क्यू टीम चे अध्यक्ष नचिकेत अवधानी,श्रेयस कांबळे,अभिलाष बनसोडे,भक्ती स्वामी आदि लोकांनी या संपूर्ण प्रक्रियेत सहभाग घेऊन पुनर्भेट यशस्वी करण्यात आली .

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077